**दिनांक - 27/12/22**
**विषय - पुनर्निर्माण प्रकल्पा संबंधी आपले सल्लागार आणि पंच समिती ची पुढील वाटचाल ठरविण्या साठी 19/12/22 ला झालेली मीटिंग.**

दिनांक 19/12/22 ला आपल्या सल्लागारां बरोबर त्यांच्या ऑफिस मधे संस्थे च्या पंच समिती सदस्यांची बैठक झाली. ह्या बैठकी मधे आपल्या पुनर्निर्माण प्रकल्पा ची पुढची वाटचाल कशी असेल आणि त्या करिता tentatively कशी time frame असेल हे ठरविण्यात आले.

12/12/22 ते 15/12/22 ह्या काळात ज्या 10 विकसकांचे प्रेझेन्टेशन संस्थे च्या सभागृहात झाले होते आणि ज्या वर सर्व पंच समिती सदस्य, सल्लागार आणि विशेष आमंत्रित सभासदांनी आपले अभिप्राय दिले होते, त्या वर ही सखोल चर्चा झाली आणि सर्वांनुमते 7 विकासकांची यादी शॉर्ट लिस्ट करण्यात आली. ज्या आधारे ही शॉर्ट लिस्टिंग केली गेली तसेच पुढे ही जो procedure अवलंबिण्यात येणार आहे त्याचे डिटेल्स सोबत जोडलेल्या attachment मधे दिले आहेत.

ह्या मीटिंग मधे आपले सचिव श्री पटवर्धन यांनी पंच समिती सदस्यांच्या दोन सब कमिटीज स्थापित केल्या ची घोषणा केली. पहिली समिती सर्व लीगल विषय हाताळेल तर दुसरी कमिटी सर्व टेक्निकल विषय. पहिल्या कमिटीत स.श्री विजय सावंत, अनंत शाळिग्राम, सुवर्णकांत ठाकोर, ऋता बावडेकर आणि प्रदीप नेवाळकर असतील तर दुसऱ्या कमिटी मधे स. श्री विजय लेले, अनंत बेदरकर, राजाराम जोशी आणि अरुंधती भिडेअसतील. श्री पटवर्धन हे दोन्ही कमिट्यांचें चे समन्वयक म्हणून असतील.

असे ही ठरविण्यात आले की दोन्ही सब कमिटीज तातडीने त्यांना नेमून दिलेल्या कामांना सुरवात करतील ज्याने संस्थे च्या पुनर्निर्माण कार्या ला गति देता येईल.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती साठी**